# सर्व शिक्षा अभियान

## केंद्र व राज्य शासन संयुक्त योजना

### 1. योजनेचे नांव :- गट साधन अनुदान

प्रत्येक तालुक्यामध्ये सर्व शिक्षा अभियान अंतर्गत गट साधन केंद्र आहे. सदर गट साधन केंद्राकडून शाळास्तर व गट स्तरावरील सर्व शिक्षा अभियान अंतर्गत राबविणेत येणाऱ्या उपक्रमाचे सनियंत्रन करणेत येते. सर्व शिक्षा अभियान अंतर्गत गटस्तर / तालुकास्तरावरील प्रशासकीय कामकाज करणेत येते.

यासाठी प्रत्येक गटासाठी सादील खर्चासाठी रक्कम रू. 50000/- व सभा प्रवास खर्चासाठी रक्कम रू. 30000/- व सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी यांचे वेतनासाठी अनुदान देणेत येते.

गटातील सर्व शाळांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणेकामी, सर्व मुलांना शिक्षणाच्या सविधा उपलब्ध करून देणे, गटस्तरावर उद्‌भवणाऱ्या अध्ययन अध्यापन विषयक समस्या सोडविणे, दिव्यंाग मुलांच्या शस्त्रक्रीया व इतर लाभ मिळणेकामी उचित प्रस्ताव योग्य ती छाननी करुन सादर करणे, बांधकामांवर नियंत्रण ठेवणे, शिक्षक प्रशिक्षण, गटस्तरावर प्राप्त होणारी विविध अनुदान वित्तीय निकषाच्या अधिन राहून मुदतीत खर्च करणे इ. कामे गटसाधन केंद्रा मार्फत केली जातात.

### 2. योजनेचे नांव :- समुह साधन अनुदान

प्रत्येक तालुक्यामध्ये सर्व शिक्षा अभियान अंतर्गत शाळा संख्येनुसार समुह साधन केंद्रे आहेत. सदर समुह साधन केंद्राकडून शाळास्तरावर सर्व शिक्षा अभियान अंतर्गत राबविणेत येणाऱ्या उपक्रमाचे सनियंत्रन करणेत येते. यासाठी प्रत्येक केद्रासाठी सादील खर्चासाठी रक्कम रू. 10000/- व सभा प्रवास खर्चासाठी रक्कम रू. 1200/- अनुदान देणेत येते. जिल्हापरिषद कोल्हापूर कडे 183 (जिप. 171 व न पा 12) समुह साधन केंद्रे आहेत.

सर्व शिक्षा अभियान अंतर्गत योजनेच्या अमंलबजावणी कामी केंद्रप्रमुखाकडून केद्रांतर्गत मुख्याध्यापकंाची सभा बोलविणे, मार्गदर्शन करणे, केंद्र प्रमुखांनी शाळांना भेटी देणे. इ.कामे समुह साधन केंद्राअंतर्गत केली जातात.

**3. योजनेचे नाव :- विशेष गरजाधिष्ठीत बालकांसाठी (दिव्यांग) समावेशित शिक्षण**

**समावेशित** शिक्षण योजने अंतर्गत विशेष गरजा असणा-या बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात गुणवत्ता पूर्ण शिक्षण मिळण्यासाठी या उपक्रमामध्ये कार्यवाही केली जाते. दिव्यांग बालकाना गरजेनुरूप दृष्टी मूल्यमापन, श्रवण मूल्यमापन, मानसशास्त्रीय शैक्षणिक मूल्यमापन, सुलभ हलनचलन व बैठक व्यवस्थेसाठी शारिरिक मूल्यमापन, शस्त्रक्रिया , साहित्य आणि साधने / उपकरणे, तीव्र स्वरूपातील बालकांसाठी मदतनीस भत्ता, प्रवासभत्ता, ब्रेलबुक व लार्ज प्रिंट या सेवा सुविधा प्रत्यक्ष बालकांना दिल्या जातात. जन जागृती व उदबोधन होण्याकरीता शिक्षक प्रशिक्षण व पालक प्रशिक्षण देणे. विशेष गरजाधिष्ठीत बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवणे करीता त्यांना सेवा-सुविधा पुरवणे, पालक, बालक व शिक्षक यांना येणा-या समस्या/अडचणी सोडवणे करीता विशेष तज्ञ 24(अंध 02,मतिमंद 10,कर्णबधिर 10,मानसउपचारतज्ञ 1,भौतिक उपचारतज्ञ 1) तसेच विशेष फिरता शिक्षक 27 (मतिमंद 11,कर्णबधिर 12, अंध 4,) कार्यरत आहेत.

**योजनेचे निकष व अटी शर्ती :-** 0 ते 18 वयोगटातील विशेष गरजा असणारी बालके (दिव्यांग), जिल्हा परीषद कार्यक्षेत्रातील.

## 4. योजनेचे नाव :- गणवेश

**इ.** 1 ली ते 8 वी च्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळामधील सर्व मुली, अनु.जाती / जमाती व दारिद्र्य रेषेखालील पालकांची मुले अशा लाभार्थी विद्यार्थी यांना प्रति विद्यार्थी र.रू. 400/- इतके अनुदान दोन गणवेश संचाकरीता तरतूद मंजूर आहे. सदरचा निधी शासनाच्या निकषानुसार संबंधित शाळा व्यवस्थापन समितीकडे जिल्हा स्तरावरून RTGS प्रणालीद्वारे वर्ग करणेत येतो.

## 5. योजनेचे नाव :- मोफत पाठ्यपुस्तके

शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा तसेच खाजगी अनुदानित शाळेतील इ. 1 ली ते 8 वी ( प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा) च्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व स्वाध्यायपुस्तिका वितरण करणेत येतात. बालभारती पाठ्यपुस्तक भांडार, शिरोली, कोल्हापूर येथून सर्व पाठ्यपुस्तके उपलब्ध करून घेऊन गट स्तरामार्फत संबंधित शाळांना वितरीत करणेत येतात. दरवर्षी शाळेच्या प्रथम दिनी सर्व पाठ्यपुस्तके वितरीत करणेत येतात.

## 6. योजनेचे नाव :- अतिथी निदेशक पथक

सन 2016-17 मध्ये, 07 ऑक्टोबर 2015 च्या शासन निर्णयानुसार 100 पटापेक्षा अधिक विद्यार्थी संख्या असणा-या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उच्च प्राथमिक शाळांमध्ये (इ. 6 वी ते 8 वी) मानधन तत्त्वावर तात्पुरत्या स्वरूपात शाळा व्यवस्थापन समिती मार्फत संबंधित शाळांमध्ये कला, कार्यानुभव व शारिरिक शिक्षण या विषयाचे अतिथी निदेशक नियुक्त करणेची कार्यवाही केली जाते. शासन निर्णयानुसार प्रति तासिका रक्कम रु.50/-

प्रमाणे होणाऱ्या तासिकाचे मानधन संबंधितांना आदा करणेत येते. अतिथी निदेशक पथकांमधील निदेशकांना प्रति निदेशक रू. 50000/- प्रमाणे मानधन दिले जाते. निदेशकांच्या मानधनाची तरतूद संबंधित शाळा व्यवस्थापन समितीकडे वर्ग करणेत आली आहे.

## 7. योजनेचे नाव :- शिक्षक वेतन

**योजनेची संक्षिप्त माहीती** - 161 नवीन प्राथमिक शाळांमध्ये कार्यरत 322 नियमित शिक्षकांसाठी रू. 6.00 लाख याप्रमाणे सर्व शिक्षा अभियान अंतर्गत वेतन तरतूद करण्यात येते.

## 8. योजनेचे नाव :- शिक्षक प्रशिक्षण

**योजनेची संक्षिप्त माहीती** - सर्व प्रकारची शिक्षक प्र शिक्षणे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, डाएट, कोल्हापूर या संस्थेमार्फत घेणेत येतात. तसेच सर्व शिक्षा अभियान शिक्षक प्रशिक्षण लेखाशिर्षातून या प्रशिक्षणाचा खर्च डायट कोल्हापूर या संस्थेला त्यांच्या मागणीनुसार विहीत प्रक्रिया पूर्ण करुन आदा करणेत येतो. शिक्षकांच्या ऑनलाईन मागणीनुसार संबंधित विषयाचे प्रशिक्षण त्यांना दिले जाते. यामध्ये पुनर्रचित अभ्यासक्रम प्रशिक्षण, तंत्रस्नेही शिक्षक प्रशिक्षण, गणित प्रशिक्षण, स्पोकन इंग्लिश प्रशिक्षण तसेच शिक्षणाची वारी उपक्रमांचा सहभाग होतो.

## 9. योजनेचे नाव :- शिक्षक अनुदान

**योजनेची संक्षिप्त माहीती -**

प्राथमिक इ. 1 ली ते 5 वी व उच्च प्राथमिक इ. 6 वी ते 8 वी मधील कार्यरत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील व खाजगी अनु. शाळांमधील शिक्षकांना शैक्षणिक साधने तयार करणेसाठी प्रति शिक्षक रू. 500/- प्रमाणे अनुदान वितरीत करण्यात येते. या अनुदानाचा उपयोग शिक्षकांना शैक्षणिक साधने तयार करणेसाठी होतो.

## 10. योजनेचे नाव :- बांधकाम

**योजनेची संक्षिप्त माहीती -**

सर्व शिक्षा अभियान सन 2003-04 ते सन 2016-17 अखेर 7170 मंजूर बांधकामे होती. 7079 बांधकामे पूर्ण

झाली व 90 बांधकामे प्रगतीत आहेत. सन 2016-17 मध्ये पुढीलप्रमाणे बांधकामे मंजूर झालेली आहेत-

१) धोकादायक स्थितीतील वर्गखोली (Dailiapated Building) बांधकामाकरिता रू. 8.37 लाख मंजूर होते.
सदरचे बांधकामे पूर्ण झालेली आहेत.

२) ग्रामीण भागातील 150 अतिरिक्त वर्गखोलीकरीता रू. 182.40 लाख मंजूर होते. त्यापैकी 122 बांधकामे पुर्ण
असून 38 बांधकामे प्रगतीत आहेत.

३) अतिरिक्त स्वच्छतागृह मुलांसाठी 42 उद्दीष्टाकरीता रू. 77.20 लाख मंजूर असून त्यापैकी 6 बांधकामे पूर्ण झाली
असून 36 बांधकामे प्रगतीत आहेत.

४) मुलींसाठी 20 भौतिक उद्दीष्टाकरीता रू. 39.14 लाख मंजूर असून त्यापैकी 5 बांधकामे पूर्ण झाली असून 15
बांधकामे प्रगतीत आहेत.

५) सन 2015-16 च्या वर्गखोली बांधकामांसाठी Spillover मध्ये 1 वर्गखोलीसाठी रू. 6.90 लाख व 2
वर्गखोलीसाठी रू. 13.80 लाख तरतूद मंजूर आहे. सदरची बांधकामे प्रगतीत आहेत.

६) विशेष दुरूस्तीसाठी 20 प्राथमिक शाळांसाठी रू. 34.23 लाख याप्रमाणे बांधकाम मंजूर होते. सदरची बांधकामे पूर्ण झालेली आहेत.

## 11. योजनेचे नाव :- शाळा व्यवस्थापन समिती प्रशिक्षण

**योजनेची संक्षिप्त माहीती -**

शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांकरीता अनिवासी स्वरूपात 3 दिवसीय प्रशिक्षण देण्यात येते. एखाद्या शाळेमधील

शाळा व्यवस्थापन समिती मार्फत शाळेमध्ये शैक्षणिक उठाव चांगल्या स्वरुपात झाला असेल तसेच शाळेची गुणवत्ता वाढली असेल अगर शाळा प्रगत झाली असेल अशा शाळेला नजीकच्या शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीने भेट दयावी व त्यांच्या शाळेमध्ये योग्य ते बदल घडवून आणावेत अशी या योजनेची संकल्पना आहे.

## 12. योजनेचे नाव :- नवोपक्रम - संगणक शिक्षण

### योजनेची संक्षिप्त माहीती ज्ञ्

सर्व शिक्षा अभियान नवोपक्रमांतर्गत संगणक शिक्षण (CAL) अंतर्गत उच्च प्राथमिक शाळेस डिजिटल वर्ग निर्मितीसाठी केंद्रशासनामार्फत अनुदान उपलब्ध होते. या अनुदानाचा विनियोग त्या शाळेतील उच्च प्राथमिक तीन वर्गासाठी करावयाचा असून प्रत्येक वर्गासाठी तीन नग 32 इंची LFD SCREEN व तीन नग Tablet हे साहित्य खरेदी करण्यासाठी करावयाचा आहे.

दिनांक 9 जानेवारी 2017 च्या जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम शासन परिपत्रकानुसार डिजिटल वर्ग निर्मितीसाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई कार्यालयाने नमूद केलेल्या specifications नूसार साहित्य उपलब्ध करून घेण्याचे आहे. शासनाने विहित केलेल्या प्रक्रीयेद्वारा खरेदी नियमावलीतील विहित तरतुदीचे पालन करून शाळा व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने नमूद साहित्य शाळास्तरावर खरेदी करण्याच्या सूचना आहेत.

## 13. योजनेचे नाव - द्विभाषिक पुस्तकं शाळांना उपलब्ध करून देणे.

### योजनेची संशिप्त माहिती -

मुलांना नियमित वाचनाची सवय व गोडी लागावी या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने दिनांक 15 ऑक्टोबर हा डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्म दिवस वाचन प्ररेणा दिन म्हणून साजरा करणेत येतो. त्यानुसार प्रत्येक शाळेत डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम वाचन कट्टा उभारण्यात येत आहे. त्या अनुशंगाने नाविन्यपुर्ण उपक्रमांतर्गत पढे भारत बढे भारत या कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.ज्या शाळेमध्ये 200 पुस्तकांच्या पेक्षा कमी

पुस्तक संख्या उपलब्ध आहे अशा जिल्हयातील 615 शाळांची निवड महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांनी केलेली असून प्रत्येक शाळेला 6640/- इतकी तरतूद शाळाव्यवस्थापण समितीच्या नावावर वर्ग केलेली आहे.शासनाने 360 पुस्तकांची द्विभाषिक पुस्तकांची यादी दिलेली असून प्रकाशक ही निश्चित केलेले आहेत. शाळांनी व्यवस्थापन समिती मार्फत पुस्तकांची खरेदी करावयाची आहे.सदरची पुस्तके ही मराठी व इंग्रजी अशा दोन्ही माध्यमातुन असल्यामुळे विद्यार्थ्यांचा भाषिक विकास होण्यास मदत होते.

## 14. योजनेचे नाव - कस्तुरबा गंाधी बालिका विद्यालय गगनबावडा

**योजनेची माहिती** - सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कोल्हापूर जिल्हयातील गगनबावडा या तालुक्यामध्ये कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय हे निवासी विद्यालय दि.01 जुलै, 2008 रोजी सुरू करणेत आलेले आहे. सदर विद्यालयाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी शासन निर्णयानुसार समित्या स्थापन करणेत आल्या आहेत. जिल्हा सल्लागार समिती व जिल्हा व्यवस्थापन समितीच्या बैठकांमार्फत सदर विद्यालयाच्या कामकाजा संदर्भात विचार विनिमय केला जातो. शिक्षण विभाग (प्राथ) यांचे मार्फत सदर विद्यालयावर नियंत्रण ठेवणेत येते.या विद्यालयात इयत्ता 6वी ते इयत्ता 10वी पर्यंतच्या शैक्षणिक व निवासाची सोय आहे.

**योजनेचे निकष व अटी शर्ती** -

१) निवासी शाळा नसलेल्या व शैक्षणिक मागासलेल्या गटात, मागासलेल्या वर्गातील जाती- जमातीतील मुलींसाठी गुणवत्तापुर्ण प्राथमिक शिक्षणाची निवासी व्यवस्था निर्माण करणे

२) स्त्री साक्षरतेचे प्रमाण कमी असलेल्या विभागात.

३) अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय, अल्पसंख्याक जाती-जमातीच्या मुलींसाठी.

४) किमान 75% मुली अनुसूचित जाती-जमातीच्या 25% मूली दारिद्र्य रेषेखालील कुटूंबामधून निवड करणेत येते.

५) ज्या मुलींची नोंद सर्वेक्षणामध्ये शाळाबाह्य मुलगी म्हणून झालेली आहे किंवा तालुक्यातील एखाद्या गावी मुलगी आपल्या कुटुंबियां समवेत नव्याने स्थलांतरित झाली व ती शाळाबाह्य राहील असे असल्यास अशा मुलींना कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयामधील प्रवेशास पात्र समजण्यात ये◌ेते.

६) जेथे शिक्षणाची सोय उपलब्ध नाही अशा एकाकी खेडे, वस्त्यातील मुलींना प्रवेश दिला जातो.

७) अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय जातीतील मुली आणि अल्पसंख्याक वर्गातील मुलींना प्रवेशासाठी प्राधान्य दिले जाते.

८) एकच पालक हयात असल्यास (आई किंवा वडील) त्यांचे पाल्यान्◌ा◌ा प्राधान्य दिले जाते.

९) आई किंवा वडील हयात नसलेल्या आणि या संदर्भात पालकत्व इतर व्यक्तीकडे असलेल्यास प्राधान्य दिले जाते.

१०) घटस्फोटित किंवा परित्यक्तेच्या मुलींना प्राधान्य दिले जाते.

११) शारीरिक अपंगत्वामुळे अक्षम असलेल्या पालकांच्या मुलींना प्रवेशास प्राधान्य दिले जाते.

१२) नैसगिर्क आपत्तीग्रस्त पालकं◌ाच्या मुलींना प्राधान्य दिले जाते.

# सर्व शिक्षा अभियान अंतर्गत उपक्रमांची माहिती

## १) RTE ॲक्ट २००९ कलम १२ (१) (क) अंतर्गत २५% प्रवेशाची प्रतिपूर्ती

सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये RTE Act २००९ कलम १२ (१) (क) अंतर्गत २५% प्रवेश ज्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी घेतलेला आहे, त्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती संबंधित शाळेला आदा करण्यात येते.

## २) वयानुरूप दाखल विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षण

- कधीही शाळेत दाखल न झालेल्या किंवा ३० दिवसापेक्षा जास्त सतत गैरहजर असणा-या विदयार्थ्यांना जादा सरावाद्वारे विशेष प्रशिक्षण देणे.
- अशा विदयार्थ्यांना त्यांच्या वयानुरूप समकक्ष वर्गात दाखल करून तीन महिने कालावधीत दररोज जादा एक तास अध्यापन करणे.
- विद्या परिषद पुणे यांचेमार्फत तयार केलेले विशेष प्रशिक्षण साहित्याच्या आधारे मार्गदर्शन करणे.
- स्थलांतरीत कुंटुबातील बालकांसाठी नियमित शाळेमार्फत शिक्षणाची व्यवस्था करणे.

## ३) मोफत पाठ्यपुस्तके

- शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या तसेच खाजगी आुदानित शाळेतील इ.१ ली ते ८ वीच्या सर्व विद्यार्थी या योजनेचे लाभार्थी आहेत.
- या योजनेतून सर्व विदयार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व स्वाध्यायपुस्तिका पुरविणेत येतात.
- ६ ते १४ वयोगटातील विदयार्थ्यांची नियमित उपस्थिती राहावी व गळती शून्य टक्के होणेच्या उद्देशाने ही योजना राबविण्यात येते.

## ४) मोफत गणवेश

- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इ. १ ली ते ८ वी च्या सर्व मुली, अनु.जाती / जमाती व दारिद्र्य रेषेखालील पालकांची मुले यांना गणवेशाचे दोन संच शाळा व्यवस्थापन समिती स्तरावरून देण्यात येतात. त्यासाठींची तरतूद शाळा व्यवस्थापन समितीकडे वर्ग करण्यात येते.

- राज्य शासनाच्या गणवेश व लेखा साहित्याच्या लाभार्थ्यासाठी सर्व शिक्षा अभियान मधून प्रती विदयार्थी रुपये २००/- व राज्य शासनाच्या योजनेतून रुपये २००/- तर सर्व शिक्षा अभियान अंतर्गत उर्वरित लाभार्थ्यांना प्रती विदयार्थी रुपये ४००/- प्रमाणे तरतूद मंजूर करण्यात येते.

## ५) शिक्षक वेतन

- सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मंजूर असलेल्या नवीन प्राथमिक शाळांमध्ये कार्यरत एक नियमित शिक्षक व एक निमशिक्षक (वस्तीशाळा स्वयंसेवक) यांच्या मासिक वेतनासाठी ठराविक रक्कम मंजूर करण्यात येते.
- अशा शाळामधील मंजूर दोन शिक्षक पदांपैकी एक नियमित शिक्षक व एक निमशिक्षक (वस्तीशाळा स्वयंसेवक) यांच्या वेतनासाठी अनुक्रमे रु. १९२५० व रु .३५०० दरमहा याप्रमाणे तरतूद मंजूर करण्यात येते.
- सदरची तरतूद शासन निर्देशानुसार जिल्हा परिषद फंडात समायोजित केली जाते.

## ६) अतिथी निदेशक पथक :-

सन २०१६-१७ मध्ये नव्याने, ०७ ऑक्टोबर २०१५ च्या शासन निर्णयानुसार १०० पटापेक्षा अधिक विद्यार्थी संख्या असणा-या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उच्च प्राथमिक शाळांमध्ये (इ. ६ वी ते ८ वी) मानधन तत्त्वावर तात्पुरत्या स्वरूपात शाळा व्यवस्थापन समिती मार्फत संबंधित शाळांमध्ये कला, कार्यानुभव व शारिरिक शिक्षण या विषयाचे अतिथी निदेशक नियुक्त करणेची आहेत.

## ७) शिक्षक प्रशिक्षण

- शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या तसेच खाजगी शाळांमधील इ. १ ली ते ८ वी च्या वर्गांना अध्यापन करणा-या शिक्षकांना पुनर्रचित प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, इतर गरजाधिष्ठीत प्रशिक्षणे, मुख्याध्यापक तसेच साधनव्यक्ती प्रशिक्षण अशी विविध सेवांतर्गत प्रशिक्षणे आयोजित करण्यात येतात.
- शिक्षक प्रशिक्षणाची कार्यवाही ही विदया परिषद पुणे यांचे नियोजन व सूचनांप्रमाणे करण्यात येते.

## ८) गट साधन केंद्र अनुदान (BRC)

- सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मंजूर असणा-या विविध उपक्रमांच्या अमंलबजावणीसाठी प्रत्येक गटस्तरावर गटसाधन केंद्र कार्यरत आहे.
- गटसाधन केद्रातंर्गत कार्यरत गटसमन्वयक, विशेष विषयातील विषयतज्ञ, समावेशित शिक्षण विषयतज्ञ, डाटा एट्री ऑपरेटर यांचे वेतनासाठी तरतूद मंजूर करण्यात येते.

- गटसाधन केंद्राच्या आकस्मित खर्च, सभा व प्रवास याकरीता प्रती गटसाधन केद्रांस रुपये ८०,०००/- अनुदान मंजूर करण्यात येते.

## ९) केद्र साधन केंद्र अनुदान (CRC)

- सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मंजूर असणा-या विविध उपक्रमांच्या अमंलबजावणीसाठी प्रत्येक केद्रशाळा स्तरावर समुह साधन केंद्र कार्यरत आहे.
- समुह साधन केंद्रस्तरावरील सादिल व सभा प्रवास याकरीता प्रती समुह साधन केद्रांस रुपये २२,०००/- अनुदान मंजूर करण्यात येते.

## १०) नवोपक्रम अंतर्गत उच्च प्राथमिक शाळांसाठी संगणक शिक्षण

सर्व शिक्षा अभियान नाविन्यपूर्ण उपक्रम संगणक शिक्षण या उपक्रमातून विद्यार्थ्याची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी,विद्यार्थ्याना संगणकाच्या सहाय्याने शैक्षणिक ज्ञान घेता यावे तसेच विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये गोडी निर्माण व्हावी यासाठी उच्च प्राथमिक शाळांमध्ये संगणक शिक्षण सुविधा निर्माण करण्यात येतात.

नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत २९ उच्च प्राथ. शाळांमध्ये संगणक शिक्षण सुविधा उपलब्धतेसाठी र.रू. ४९.९१ लाख तरतूद मंजूर आहे.

## ११) शिक्षक अनुदान

सन २०१६-१७ मध्ये नव्याने प्राथमिक इ. १ ली ते ५ वी व उच्च प्राथमिक इ. ६ वी ते ८ वी मधील कार्यरत (खाजगी अनु. व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील) शिक्षकांना प्रति शिक्षक रू. ५००/- प्रमाणे अनुदान मंजूर असून यामध्ये शैक्षणिक साधने तयार करणे अपेक्षित आहे.

## १२) शाळा अनुदान

- शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, व खाजगी आुदानित शाळांना सादिल खर्चासाठी हे अनुदान वितरीत करण्यात येते.
- प्राथमिक शाळांना रु.५०००/- प्रमाणे व उच्च प्राथमिक शाळांना रु.७०००/- प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात येते.
- या अनुदानातून शाळेसाठी लागणारे शैक्षणिक, क्रीडा, संगीत विषयी साहित्य तसेच फर्निचर खरेदी करणेत येते.

## १३) शाळा देखभाल दुरूस्ती अनुदान

- शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांमधील किरकोळ दुरुस्तीसाठी ही तरतूद मंजूर करण्यात येते.
- या अनुदानातून शाळेतील अध्ययन पूरक खोल्याची किरकोळ दुरुस्ती करण्यात येते.
- प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांसाठी एकत्रित रुपये ७५००/- प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात येते.
- अध्यापनासाठी तीन पर्यतच्या खोल्या उपलब्ध असणा-या शाळांना रुपये ५०००/- व त्यापेक्षा जास्त खोल्या असणा-या शाळांना रुपये १०,०००/- अनुदान वितरीत करण्यात येते.

## १४) समावेशित शिक्षण

- ० ते १८ या वयोगटातील विशेष गरजा असणा-या विदयार्थ्यांचा शालेय आरोग्य तपासणीद्वारे तसेच विशेष शिक्षकांच्या सर्व्हेक्षणाद्वारे शोध घेण्यात येतो.
- विशेष गरजाधिष्ठीत बालकांना आवश्यक साहित्य साधने, लोव्हिजन साहित्य, श्रवणयंत्रे, मदतनीस, प्रवास भत्ता इत्यादी सुविधा पुरविण्यात येतात. तसेच गरजेनुसार शासकिय व शासनमान्य रुग्णालयामध्ये शस्त्रक्रिया करण्यात येतात.
- अध्ययन व अध्यापनासाठी विशेष शिक्षकांची नेमणूक करण्यात येते.

## १५) नाविन्यपूर्ण उपक्रम (पढे भारत बढे भारत)

या उपक्रमांतर्गत मुलींचे शिक्षण, अनु. जाती-जमाती मुले, अल्पसंख्यांक मुले व शहरी भागातील वंचित (दुर्लक्षित) मुलांसाठी विविध उपक्रमाची अमंलबजावणी करण्यात येते.

नाविन्यपूर्ण उपक्रम (पढे भारत बढे भारत) अंतर्गत राबविण्यात येणा-या उपक्रम राज्य स्तरावरून निच्छित करण्यात येणार आहेत.

## १६) शाळा व्यवस्थापन समिती प्रशिक्षण

- शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांना तीन दिवसाचे अनिवासी प्रशिक्षण देण्यात येते.
- सदर प्रशिक्षणाव्दारे शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचे शालेय कामकाजात सहकार्य वाढविणेसाठी मदत घेतली जाते.
- शाळा व्यवस्थापन समिती सदस्य प्रशिक्षणामुळे समाजाचा सहभाग वाढविणेस मदत होते.

## १७) बांधकाम

- गटांकडून प्राप्त झालेल्या वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकानुसार जिल्हाचे वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक तयार करुन मंजूरीसाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई या कार्यालयाकडे सादर केले जाते. त्यांनी मंजूरी दिलेनंतर त्याची प्रशासकीय मान्यता जिल्हा कार्यकारिणी समिती यांचेमार्फत दिली जाते.

- सर्व शिक्षा अभियान अंतर्गत बांधकामे शाळा व्यवस्थापन समितीच्या सहभागातून केली जातात.

| अ. क्रं. | बाब | २००३- ०४ ते २०१५-१६ | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर | पूर्ण | प्रगती पथावर | सुरु न झालेली / रद्द |
| १ | गट साधन केंद्र | १२ | १२ | ० | ० |
| २ | समुह साधन केंद्र | १०७ | १०७ | ० | ० |
| ३ | नवीन प्राथ.शाळा (वस्तीशाळा) | १८३ | १८० | १ | २ |
| ४ | वर्गखोल्या बांधकामे | २८५१ | २८०४ | ४४ | ३ |
| ५ | संरक्षक भिंत | १६२ | १६२ | ० | ० |
| ६ | शाळा दुरुस्ती | २१८ | २१८ | ० | ० |
| ७ | स्वच्छतागृहे | ६४७ | ६४७ | ० | ० |
| ८ | पिण्याच्या पाण्याची सोय | ५४२ | ५४२ | ० | ० |
| ९ | गट साधन केंद्र इमारतीचे सक्षमीकरण | १२ | ११ | १ | ० |
| १० | विद्युतिकरण | १०३२ | १०३२ | ० | ० |
| ११ | मुलीचे स्वच्छतागृहे | ६९३ | ६९३ | ० | ० |
| एकूण | | ६४५९ | ६४०९ | ४५ | ५ |

## १८) व्यवस्थापन

- सशिअ अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते व्यवस्थापन या लेखाशिर्षातून आदा करणेत येतात.

  सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचा-यांचे वेता व भत्ते, कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यकतेनुसार उपयोगात आणली जाते.

### ➢ अध्ययन समृद्धी कार्यक्रम (LEP) निकष :-

- या कार्यक्रमासाठी जिल्ह्याच्या वार्षिक कार्ययोजना अंदाजपत्रकाच्या २% टक्क्यापर्यंत असते.
- गुणवत्ता वाढीसाठी प्राथमिक शाळास्तरावर सदरचा कार्यक्रम राबविणेत येतो.
- अध्ययन कृती व शैक्षणिक साहित्याच्या मदतीने विदयार्थ्यानी स्वत: शिकण्याचा प्रयत करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येतो.

### ➢ लोकजागृती अंतर्गत मीना राजू मंच उपक्रम :-

- शालेय स्तरावर मुला-मुलींच्यामध्ये लिंगसमभाव निर्माण करणे, मुलेमुली यांच्यामध्ये निकोप नातेसंबध निर्माण करणे, दोघांनाही संधीची समानता देणे .
- स्थानिक स्वराज्य संस्थेच्या उच्च प्राथमिक शाळेमध्ये मीना राजू मंच हा उपक्रम राबविणेत येत आहे.
- मीना आणि राजू मंच हा शाळेतील लीडरशिप करणा-या इयत्ता ५वी ते इयत्ता ८ वी तील विद्यार्थ्यांचा गट आहे.
- या विदयार्थ्यांच्या माध्यमातून शाळेतील सर्व विद्यार्थ्यांकरीता उपक्रम राबविणेत येतो.

## १९) कस्तुरबा गांधी बालिका विदयालय

- अर्थिकदृष्टया मागास असलेल्या व स्त्री साक्षरतेचा दर राष्ट्रीय स्त्री साक्षरता दरापेक्षा कमी असलेल्या गटामध्ये कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय सुरु करण्यात आले आहे.
- या विद्यालयात अनु जाती /जमाती, इमाव,अल्पसंख्याक या संवर्गातील विद्यार्थिनिंसाठी ७५%प्रवेश दिले जात असून २५ % प्रवेश हे द्रारीद्रय रेषेखालील मुलींना देणेत येतात. तसेच एकच पालक हयात असणा- या, - नैसर्गिक आपत्तीग्रस्त पालकांच्या मुलींना,अनाथ मुलींना प्राधान्याने प्रवेश दिले जातात.
- इ. ८ वी पर्यंत सर्व शिक्षा अभियान अंतर्गत व इयत्ता ९ वी व १० वी करीता जिल्हा नियोजन समिती मार्फत तरतूद प्राप्त होते.